## रे. दिवाणी मुकदमा नं. ८५/२०१८ मधील नि. ८२ वरील आदेश
## (जालिंदर केरु सुर्यवंशी वि. राजू बाबूराव सुर्यवंशी वगैरे)
## (**CNR No. MHSN**120006652018)

१. वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दावामध्ये दुरुस्तीकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. **वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

दावा मिळकतीचे वादी व त्यचे इतर सहहिस्सेदार मालक आहेत असे जाहीर होवून रेव्हेन्यु अधिकारी उपविभागिय अधिकारी यांनी बी एन डी केस नं. ३/१६ व ४/१६ चे कामी दिलेले निर्णय रद्द होवून प्रतिवादी क्र. १ ते २५ यांनी स्वतः अगर हस्तक, एजंट, नातेवाईक यांचेमार्फत वादी व इतर सहहिस्सेदारांना हुसकावून लावू नये म्हणून प्रतिवादी नं. १ ते २५ यांना निरंतरची ताकीद देवविण्यात यावी. याकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे काम चालू दावा मिळकत ग.नं. १०४८ यामधील क्षेत्र रेश्मा राहूल जाधव यांना दि. ०६/०४/२०१८, मिनाक्षी कबेर सावंत यांना दि. १२/०२/२०२१ व कैलास लक्ष्मण सावंत, निवास लक्ष्मण सावंत यांना दि.०३/०३/२०२१ रोजी खरेदी दिलेले आहे. सदर दावेचे कामी वादींनी वादी व इतर हिस्सेदारांना हुसकावुन लावू नये म्हणून ताकीदीची मागणी केलेली आहे. त्यामुळे दावा मिळकतीतील वादीचे खरेदीदार हे आवश्यक व जरुरीचे पक्षकार आहेत तरी सदर दाव्याचे कामी खालीलप्रमाणे दावा दुरुस्तीस परवानगी द्यावी अशी विनंती केली आहे.

**अ. प्रतिवादी क्र. २७ चे नंतर –**

**२८.**रेश्मा राहूल जाधव

वय ४० वर्षे, धंदा – घरकाम

रा. सावंतपूर, ता. पलूस, जि. सांगली

२९.मिनाक्षी कुबेर सावंत

वय ५१ वर्षे, धंदा – घरकाम

रा. सावंतपूर, ता. पलूस, जि. सांगली

३०. कैलास लक्ष्मण सावंत

वय ४८ वर्षे, धंदा – शेती

रा. सावंतपूर, ता. पलूस, जि. सांगली

३१. निवास लक्ष्मण सावंत

वय ५४ वर्षे, धंदा – शेती

रा. सावंतपूर, ता. पलूस, जि. सांगली

**ब. तसेच दावा कलम ४ चे शेवटी** – “वादीनी सदरचा दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी क्र. २८ ते ३१ यांचेशी दावा मिळकतीतील क्षेत्राबाबत तबदिलीचा व्यवहार केलेला असलेने त्यांना याकामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील केलेले आहे.**”**

अशा दुरुस्तीस परवानगी मागितली आहे.

**३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ व १४ यांनी नि. ८९ वरच त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये कथन केले की, वादी यांनी दिलेले अर्ज व त्यात नमुद केलेली कथने धादांत खोटी व लबाडीची असल्योन त्यांना मान्य व कबूल नाहीत. सदर वादी यांनी प्रतिवादी १ व १४ यांचे मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे. सदरचे

अतिक्रमण काढून मिळणेसाठी सदर प्रतिवादींनी उपविभागीय अधिकारी कडेगाव यांच्याकडे दाद मागितली असता त्यांनी सदरचे अतिक्रमण काढणेबाबत आदेश दिले आहेत. सदरचा आदेश रद्द होणेसाठी वादी यांनी प्रस्तूतचा दावा दाखल केला आहे. सदरचे अतिक्रमण काढून देण्याची वादी यांची इच्छा व मानसिकता नाही.सदर काम लांबवणेसाठी प्रस्तूत वादी वारंवार वेगवेगळे अर्ज व कारणे देत आहेत सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादी व प्रतिवादी क्र. १ व १४ च्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कोणत्याही दाव्याचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी व दाव्याचे वर्णन अचुक असणे आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे निराकरण होण्यास मदतच होणार आहे. प्रस्तुतच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याकामी वादी व प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्यासाठी संधी उपलब्ध असणार आहे. सबब प्रस्तुतची दुरुस्ती ही दाव्याच्या निराकरणासाठी अत्यंत आवश्यक असल्या कारणाने सदरची दुरुस्ती करणेस परवानगी देणे योग्य होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** वादी यांचा नि. ८२ चा अर्ज र. रु. १,०००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांचे मागणीप्रमाणे विहीत वेळेत नि. ८२ चे अर्जात सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

३. वादी यांनी सदरची दुरुस्ती करुन सदरची दावा दुरुस्त प्रत मे. कोर्टासाठी व प्रतिवादीसाठी पुढील तारखेस हजर करावी.

IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2024.08.22 10:50:27 +0530

**पलूस** **(आय. ए. वाय. ए. खान)**

**दिनांक– २१/०८/२०२४** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. Jyoti A. Salunkhe<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 21/08/2024 |
| Signed by P. O. on | : | 21/08/2024 |
| Uploaded on | : | 22/08/2024 |